क्र.पुनर्रचना कक्ष/चिटफंड/प्र.क्र.६४/ब- ३८५          दि. २२.१२.२०११

पुनर्रचना कक्ष,
अपर विक्रीकर आयुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय,
३ रा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई -१०.

विषय :- विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने चिटफंड नियम २००४ अन्वये प्राधिकृत केलेल्या कार्यभारांचे हस्तांतरण.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. विकआ-१२११/प्र.क्र.२९१/वि.प्र.४, दि.१८.११.२०११
२. अधिसूचना क्र. चिटफंड १००७/प्र.क्र.६०/कराधान-३, दि. २९.१२.२००७
३. विक्रीकर आयुक्तांचे कार्यालयीन आदेश क्रमांक अविआ/म.रा./कार्या.निहाय पदे/ पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.३/ब-३७८, दि.०१.१२.२०११.

## कार्यालयीन आदेश

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयास अनुसरुन विक्रीकर विभागाची पुनर्रचना करण्यात आली असून दि. ०१.०१.२०१२ पासून नवीन आकृतीबंध अस्तित्त्वात येणार आहे. महाराष्ट्र मूल्यावर्धित कर कायदा २००२ अन्वये नेमलेल्या ३२ अधिकाऱ्यांना उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या अधिसूचनेस अनुसरुन अतिरिक्त चिटफंड प्रबंधक व सहचिटफंड प्रबंधक म्हणून अधिकार देण्यात आले होते. विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेनंतर काही कार्यभार एकत्रित/विसर्जित होणार आहेत तसेच काही विभाग आणि कार्यालये नव्याने अस्तित्त्वात येणार आहेत. त्याचप्रमाणे काही पदांच्या पदनामात बदल होणार आहेत. तसेच नवी मुंबई हा ठाणे विक्रीकर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील भाग कोकणभवन या कार्यालयास जोडण्यात येत आहे. त्यामुळे चिटफंड कायद्याच्या प्रशासनाचे काम काही ठिकाणी नवीन कार्यभारांकडे सोपविणे आवश्यक आहे.

ज्या अधिकाऱ्यांकडे संदर्भ क्र.२ च्या अधिसूचनेनुसार चिटफंड कायद्याच्या प्रशासनाचे काम सोपविण्यात आले होते आणि सदर अधिकाऱ्याच्या पदनामात दि. ०१.१२.२०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये बदल झाले आहेत, त्या अधिकाऱ्यांना दि. ०१.०१.२०१२ पासून नंतरदेखील प्राधिकृत करण्यात येत आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १६, १७, १८, २२, २६, २८ व ३१ वर दर्शविण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या पदनामात बदल होणार आहेत.

संदर्भ क्र.२ च्या अधिसूचनेस अनुसरुन चिटफंड कायदा १९८२ व महाराष्ट्र चिटफंड नियम २००४ अन्वये चिटफंड कायद्याच्या प्रशासनाचे काम करण्यासाठी अधिकार प्रदान केलेल्या ३२ अधिकाऱ्यांपैकी ३ अधिकाऱ्यांच्या कार्यभारात बदल होणार आहेत. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांच्या कार्यभाराचे हस्तांतरण करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खाली दिलेल्या तक्त्यातील स्तंभ क्र. ४ मधील अधिकाऱ्यांना चिटफंड कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात येत आहे. चिटफंड कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र. २ च्या अधिसूचनेनुसार अधिकार देण्यात आलेल्या खालील स्तंभ क्र. २ मधील अधिकाऱ्यांनी स्तंभ-४ मधील नवनियुक्त अधिकाऱ्यांकडे चिटफंडाच्या कार्यभारांचे हस्तांतरण करावे. सदर हस्तांतरण करताना स्तंभ ५ मध्ये दिलेल्या क्षेत्राशी संबंधित सर्व अभिलेख, नोंदवहया व इतर कागदपत्रे यांच्या यादया व गोषवारे काढून स्तंभ-२ मधील अधिकाऱ्यांनी स्तंभ-४ मधील अधिकाऱ्यांकडे हस्तांतरीत करावीत.

| अ. क्र. | दि.२९.१२.२००७ च्या अधिसूचनेअन्वये प्राधिकृत केलेले अधिकारी | स्तंभ क्रमांक २ मधील अधिकाऱ्याचे महाराष्ट्र चिटफंड कायदा,१९८२ अन्वये पदनाम | दि.१४.११.२०११ च्या शासन निर्णयास अनुसरुन प्राधिकृत करावयाचे अधिकारी | ज्या स्थानिक क्षेत्राचा कार्यभार हस्तांतरीत करायचा आहे ते स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | विक्रीकर सहआयुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण) ३, मुंबई | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, मुंबई | विक्रीकर सहआयुक्त (अन्वेषण) ब, मुंबई | महसूल जिल्हे मुंबई व मुंबई उपनगरे |
| २ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), ठाणे शहर विभाग, ठाणे. | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, ठाणे | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), रायगड विभाग, बेलापूर | महसूल क्षेत्र नवी मुंबई |
| ३ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, पुणे | विक्रीकर सहआयुक्त (मोठे करदाते कक्ष) १, पुणे | महसूल क्षेत्र पुणे जिल्हा |
| ४ | विक्रीकर उपआयुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण) १९, मुंबई | सहचिटफंड प्रबंधक, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (अन्वेषण-४) अन्वेषण-ब, मुंबई | महसूल जिल्हे मुंबई व मुंबई उपनगरे |
| ५ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, ठाणे | सहचिटफंड प्रबंधक, ठाणे. | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, बेलापूर | महसूल क्षेत्र नवी मुंबई |

वरील परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या इतर अधिकाऱ्यांच्या पदनामात अगर कार्यभारात कसलाही बदल होत नसल्याने ते पूर्वीप्रमाणेच चिटफंड कायद्याच्या प्रशासनाचे काम पाहतील.

कार्यभार हस्तांतरणाची कार्यवाही तातडीने दिनांक ३१.१२.२०११ पर्यंत पूर्ण करण्यात यावी. विक्रीकर उपायुक्तांच्या कार्यभार हस्तांतरणाबाबत संबंधित विक्रीकर सहआयुक्तांनी पर्यवेक्षण करावे. तसेच विक्रीकर सहआयुक्तांच्या कार्यभार हस्तांतरणाबाबत क्षेत्रीय अपर विक्रीकर आयुक्तांनी पर्यवेक्षण करावे.

सोबत: परिशिष्ट

(एस.पी. कडू-पाटील)
अपर विक्रीकर आयुक्त (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति:-

१. सर्व अपर विक्रीकर आयुक्त
२. सर्व विभागीय सहआयुक्त
३. विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय)१, मुंबई (अधिसूचना संबंधाने)
४. स्तंभ क्र.२ मधील व स्तंभ क्र.३ मधील सर्व अधिकारी.
५. निवडनस्ती

प्रत सादर:

१. मा.विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

# परिशिष्ट

| अ.क्र. | दि.२९.१२.२००७ च्या अधिसूचनेअन्वये प्राधिकृत केलेले अधिकारी | दि.०१.०१.२०१२ पासून पुढे प्राधिकृत करावयाचे अधिकारी | महाराष्ट्र चिटफंड कायदा, १९८२ अन्वये पदनाम | दि.०१.०१.२०१२ पासून पुढे प्राधिकृत करावयाचे स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (६) |
| १ | विक्रीकर सहआयुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण)३, मुंबई | विक्रीकर सहआयुक्त अन्वेषण-ब, मुंबई | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, मुंबई | महसूल जिल्हे मुंबई व मुंबई उपनगरे |
| २ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), ठाणे शहर विभाग, ठाणे. | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), ठाणे शहर विभाग, ठाणे. | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, ठाणे | महसूल क्षेत्र ठाणे जिल्हा (नवी मुंबई वगळून) |
| ३ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), रायगड विभाग, बेलापूर. | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), रायगड विभाग, बेलापूर. | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, रायगड | महसूल क्षेत्र नवी मुंबई व रायगड जिल्हा |
| ४ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), पुणे विभाग, पुणे | विक्रीकर सहआयुक्त (मोठे करदाते कक्ष)१, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, पुणे | महसूल क्षेत्र पुणे जिल्हा |
| ५ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), सोलापूर विभाग, सोलापूर | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), सोलापूर विभाग, सोलापूर | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, सोलापूर | महसूल जिल्हे सोलापूर व उस्मानाबाद |
| ६ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, कोल्हापूर | महसूल जिल्हे कोल्हापूर, सातारा,सांगली , रत्नागिरी व सिंधुदुर्ग |
| ७ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नाशिक विभाग, नाशिक | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नाशिक विभाग, नाशिक | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, नाशिक | महसूल जिल्हे नाशिक व अहमदनगर |
| ८ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), धुळे विभाग, धुळे | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), धुळे विभाग, धुळे | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, धुळे | महसूल जिल्हे धुळे, जळगांव व नंदुरबार |
| ९ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नागपूर विभाग, नागपूर | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नागपूर विभाग, नागपूर | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, नागपूर | महसूल जिल्हे नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा व वर्धा |
| १० | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), अमरावती विभाग, अमरावती | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), अमरावती विभाग, अमरावती | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, अमरावती | महसूल जिल्हे अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला व वाशिम |
| ११ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, औरंगाबाद | महसूल जिल्हे औरंगाबाद, बीड व जालना |
| १२ | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नांदेड विभाग, नांदेड | विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), नांदेड विभाग, नांदेड | अतिरिक्त चिटफंड प्रबंधक, नांदेड | महसूल जिल्हे नांदेड, परभणी, लातुर व हिंगोली |
| १३ | विक्रीकर उपायुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण)१९, मुंबई | विक्रीकर उपायुक्त (अन्वे-४), अन्वेषण-ब, मुंबई | सहचिटफंड प्रबंधक, मुंबई | महसूल जिल्हे मुंबई व मुंबई उपनगरे |
| १४ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, ठाणे | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, ठाणे | सहचिटफंड प्रबंधक, ठाणे. | महसूल क्षेत्र ठाणे जिल्हा (नवी मुंबई वगळून) |
| १५ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, बेलापुर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, बेलापुर | सहचिटफंड प्रबंधक, रायगड | महसूल क्षेत्र नवी मुंबई व रायगड जिल्हा |
| १६ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, पुणे विभाग, पुणे | विक्रीकर उपायुक्त (मोठे करदाते कक्ष) १, पुणे | सहचिटफंड प्रबंधक, पुणे | महसूल क्षेत्र पुणे जिल्हा |
| १७ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, सोलापूर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)३, सोलापूर | सहचिटफंड प्रबंधक, सोलापूर | महसूल जिल्हे सोलापूर व उस्मानाबाद |
| १८ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, कोल्हापूर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)२, कोल्हापूर | सहचिटफंड प्रबंधक, कोल्हापूर | महसूल क्षेत्र कोल्हापूर जिल्हा |
| १९ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), सातारा | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), सातारा | सहचिटफंड प्रबंधक, सातारा | महसूल क्षेत्र सातारा जिल्हा |
| २० | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), सांगली | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), सांगली | सहचिटफंड प्रबंधक, सांगली | महसूल क्षेत्र सांगली जिल्हा |



विउआ, पुनर्रचना कक्ष.

## परिशिष्ट

| अ.क्र. | दि.२९.१२.२००७ च्या अधिसूचनेअन्वये प्राधिकृत केलेले अधिकारी | दि.०१.०१.२०१२ पासून पुढे प्राधिकृत करावयाचे अधिकारी | महाराष्ट्र चिटफंड कायदा, १९८२ अन्वये पदनाम | दि.०१.०१.२०१२ पासून पुढे प्राधिकृत करावयाचे स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (६) |
| २१ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), ओरस | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), ओरस | सहचिटफंड प्रबंधक, ओरस | महसूल जिल्हे सिंधुदुर्ग व रत्नागिरी |
| २२ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, नाशिक | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)२, नाशिक | सहचिटफंड प्रबंधक, नाशिक | महसूल क्षेत्र नाशिक जिल्हा |
| २३ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), अहमदनगर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), अहमदनगर | सहचिटफंड प्रबंधक, अहमदनगर | महसूल क्षेत्र अहमदनगर जिल्हा |
| २४ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, धुळे | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, धुळे | सहचिटफंड प्रबंधक, धुळे | महसूल जिल्हे धुळे व नंदूरबार |
| २५ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), जळगांव | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), जळगांव | सहचिटफंड प्रबंधक, जळगांव | महसूल क्षेत्र जळगाव जिल्हा |
| २६ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट)१, नागपूर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) २, नागपूर | सहचिटफंड प्रबंधक,नागपूर | महसूल जिल्हे नागपूर, वर्धा व भंडारा |
| २७ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), चंद्रपूर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), चंद्रपूर | सहचिटफंड प्रबंधक, चंद्रपूर | महसूल जिल्हे चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली |
| २८ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, अमरावती | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट ) २, अमरावती | सहचिटफंड प्रबंधक, अमरावती | महसूल जिल्हे अमरावती व यवतमाळ |
| २९ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), अकोला | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), अकोला | सहचिटफंड प्रबंधक, अकोला | महसूल जिल्हे अकोला, वाशिम व बुलढाणा |
| ३० | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, औरंगाबाद | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, औरंगाबाद | सहचिटफंड प्रबंधक,औरंगाबाद | महसूल जिल्हे औरंगाबाद, बीड व जालना |
| ३१ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) १, नांदेड | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट) २, नांदेड | सहचिटफंड प्रबंधक,नांदेड | महसूल जिल्हे नांदेड, परभणी व हिंगोली |
| ३२ | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), लातूर | विक्रीकर उपायुक्त (व्हॅट प्रशासन), लातूर | सहचिटफंड प्रबंधक, लातूर | महसूल क्षेत्र लातूर जिल्हा |

विअधि, पुनर्रचना कक्ष.